# विश्व अग्निहोत्र दिवस १२ रोजी

**औरंगाबाद, दि.१० (लोकमत ब्युरो)-** अक्कलकोट येथील परम सद्‌गुरू गजानन महाराज यांना ६ वे अवतार भगवान परशुरामांनी मंत्राची दीक्षा दिली. म्हणून १२ मार्च रोजी विश्व अग्निहोत्र दिवस सर्वत्र साजरा करण्यात येतो.

स्वामी समर्थांच्या आगमनाने पावन झालेल्या अक्कलकोट येथे प्रतिवर्षी लाखो भाविक दर्शनास येत असतात. दत्तात्रयांनी स्थापन केलेल्या जगातील एकमेव मूळ धर्मपीठावरील चौथे महापुरुष अक्कलकोट निवासी सत्यधर्म प्रणेता परम सद्‌गुरू गजानन महाराजांनी अखिल विश्व मानवाच्या कल्याणासाठी असलेल्या वेदधर्माची कवाडे सर्व जगाला उघडी करून दिली. १२ मार्च १९४२ रोजी परम सद्‌गुरुंना सहावे अवतार भगवान परशुरामांनी मंत्राची दीक्षा दिली. म्हणून हा विश्व अग्निहोत्र दिवस विविध धर्म संप्रदाय, जाती, जमाती, संस्कृती, देश, वेश, भाषा असलेले सर्व लोक एका छत्राखाली येऊन प्रेमभावाने साजरा करतात. हजारो वर्षांच्या उलथापालथीत नष्ट झालेली उपासना नित्य अग्निहोत्राच्या रुपाने तिच्या विशुद्ध, सात्विक आणि सहज सोप्या स्वरूपात परम सद्‌गुरू गजानन महाराजांनी आपल्या सर्वांच्या कल्याणासाठी पुन: एकवार प्रवर्तित केली आहे. महाराजांनी १९६९ साली केलेला संपूर्णपणे शुद्ध, सात्विक, अहिंसक यज्ञ महासोमयाग जगभर प्रसिद्ध आहे. यानंतर १६ अहिंसक महासोमयाग शिवपुरी, हैदराबाद, मुंबई, औरंगाबाद या ठिकाणी संपन्न झाला. पंचसाधना मार्गाचे व अग्निहोत्राचे नित्य आचरण करा हा त्यांचा कल्याणकारी संदेश प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचविण्याचे कार्य करण्यात येत आहे.